# सामान्यांसाठी असलेले देशातील पहिले अवकाश निरीक्षण केंद्र सोलापुरात



सोलापूर, २८ ऑगस्ट/प्रतिनिधी

सोलापुरातील कंबर तलावाजवळील स्मृतिवनात सामान्य जनतेसाठी सदैव खुले राहणाऱ्या देशातील पहिल्या अवकाश निरीक्षण केंद्राची उभारणी लवकरच होत आहे. या केंद्राच्या माध्यमातून पर्यटक तथा खगोलप्रेमींना आकर्षित करता येऊ शकेल. येत्या दोन महिन्यात या अवकाश निरीक्षण केंद्राचे उद्‌घाटन माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते होणार आहे.

सोलापूरचे मावळते जिल्हाधिकारी डॉ.जगदीश पाटील यांच्या पुढाकाराने साकारणाऱ्या या नव्या प्रकल्पात पाच लाख रु.खर्च करून अमेरिकेत तयार झालेली मोठी दुर्बिण बसविण्यात येणार असून या दुर्बिणीला संगणकही जोडण्यात आला आहे. या दुर्बिणाचे कार्य पूर्णतः रिमोट कंट्रोलद्वारे होत आहे. या मोठ्या दुर्बिणीशिवाय दिवसा अवकाश निरीक्षण करण्यासाठी सौरऊर्जेवर चालणारी आणि तेवढ्याच क्षमतेची दुर्बिण तसेच तुलनेने कमी क्षमतेच्या तीन दुर्बिणी कार्यान्वित होत आहेत. सध्या देशात राजस्थानच्या उदयपूर या एकमेव ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारी दुर्बिण उपलब्ध आहे. त्यानंतर अशी दुर्बिण प्रथमच सोलापुरात उपलब्ध होत आहे.

## 'जंतर-मंतर'ही साकारणार

अवकाश निरीक्षण केंद्राशिवाय जंतर-मंतर प्रकल्पही साकारण्याचा मनोदय जिल्हाधिकारी डॉ. जगदीश पाटील यांनी बोलून दाखविला. इतिहास काळात विशिष्ट प्रकारचे इमारतीचे किंवा यंत्राचे बांधकाम करून ग्रह, तारे यांचा अभ्यास केला जात असे. त्याच धर्तीवर सोलापुरात विद्यार्थी व अभ्यासकांसाठी छोट्या स्वरूपात 'जंतर-मंतर' उभारण्यात येणार आहे. देशात सध्या दिल्ली, जयपूर, मथुरा, वाराणसी व उज्जैन अशा पाच ठिकाणी जंतर-मंतर आहेत. त्यापैकी केवळ दिल्ली व जयपूर या दोन ठिकाणीच जंतर-मंतर कार्यरत आहेत.

या अवकाश निरीक्षण केंद्रासाठी ४९ लाखांची तरतूद झाली असून त्यापैकी ३५ लाखांचा निधी उपलब्ध झाला आहे. उर्वरित १४ लाखांची रक्कम लवकरच प्राप्त होणार आहे. स्मृतिवनात दुर्बिणीची प्रात्यक्षिके केल्यानंतर त्याबाबतची माहिती देताना खगोलशास्त्राचे अभ्यासक तथा या अवकाश निरीक्षण केंद्राचे मार्गदर्शक डॉ. पराग महाजनी यांनी सांगितले की, या अवकाश निरीक्षण केंद्रातील मोठ्या दुर्बिणीतून अवकाशातील कोणताही ग्रह पाहता येऊ शकेल. त्यासाठी रिमोटद्वारे केवळ त्या ग्रहाचे नाव सांगितल्यास आपसूकच ही दुर्बिण त्या दिशेला स्थिर होते आणि अवकाशातील तो ग्रह सहजगत्या दिसू शकतो. या दुर्बिणीमुळे लहानातील लहान ग्रह रात्रीच्या वेळी पाहता येणार आहे. सध्या देशात ज्या दोन-तीन ठिकाणी अवकाश निरीक्षण केंद्रांची सोय आहे, तेथे सामान्य माणसाला प्रवेश मिळत नाही, तर केवळ शास्त्रज्ञ, अभ्यासक व प्राध्यापकालाच प्रवेश दिला जातो. त्यासाठीही संबंधित तज्ज्ञांकडून प्रमाणपत्र मिळवावे लागते. परंतु प्रथमच सोलापुरात कार्यान्वित होणारे हे अवकाश निरीक्षण केंद्र सामान्य माणसासाठी नाममात्र शुल्क आकारून सदैव खुले असेल. या निरीक्षण केंद्रात प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येत आहे. ■